पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION / 43 /2022 DATE 27 /06/2022

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागातील हद्दीमध्ये डोंबिवली पूर्व संत नामदेव पथ उडगीकर रस्त्यालगत ''नारायण कृपा'' ही अतिधोकादायक इमारत दि. २९/०६/२०२२ व दि. ३०/०६/२०२२ रोजी सकाळी ०९:०० वा. ते सायंकाळी १७:०० वा. चे दरम्यान कल्याण डोंबिवली महानगरपालिका कडून निष्कासीत करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी**, डोंबिवली शहरातील संत नामदेव पथ हा पाथर्लीकडे जाणारा मुख्य रोड असून सदर रोडलगत असलेली व निष्कासीत करण्यात येणारी ''नारायण कृपा'' ही इमारत निष्कासीत करते वेळी लोकांची गर्दी होवू नये अगर सदर ठिकाणी काही अपघात होवू नये या कारणास्तव दि. २९/०६/२०२२ व दि. ३०/०६/२०२२ या दोन दिवसांकरीता सकाळी ०९:०० वा. ते सायंकाळी १७:०० वा. पावेतो डोंबिवली शहरातील संत नामदेव पथ मार्गे मानपाडा रोड कडून पाथर्ली रोडकडे येणारी व जाणारी वाहतूक तसेच पाथर्ली रोडकडून मानपाडा रोडकडे येणारी व जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद करणे आवश्यक आहे. सदर रस्त्यावर व परिसरात वाहतूक कोंडी होवू नये त्याकरीता सदर भागात वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी, या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी**, मी डी. बी. कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद –** १) संत नामदेव पथ कडून पाथर्लीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना दिपेक्स बिल्डींग व न्यु तेजस्वी बिल्डींग येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने न्यु तेजस्वी बिल्डींग लगत असलेल्या रस्त्याने पुढे जावून डावीकडे वळण घेवून टिळकनगर रोडने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पाथर्लीकडून संत नामदेव पथ मार्गे मानपाडा रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांच्या कार्तिक दर्शन बिल्डीग, बकुळ पाटील दवाखाना येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कार्तिक दर्शन बिल्डींग, बकुळ पाटील दवाखानालगत रस्त्याने डावीकडे वळण घेवून जिजाईनगर रोडने इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. २९/०६/२०२२ व दि. ३०/०६/२०२२ या दोन दिवसांकरीता सकाळी ०९:०० वा. ते सायंकाळी १७:०० वा. पावेतो बिल्डींग निष्कासीतचे काम होईपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सिजन गॅस वाहन व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डी. बी. कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

— मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
— मा. आयुक्त,कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
— प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/कल्याण.
— पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण.
— पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
— परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
— विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग,ठाणे/कल्याण.
— नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर.
— ठाणे पोलीस पत्रक.

प्रत — पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.
२/— सदरची अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, ठाणे शहर.
पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
कार्यकारी अभियंता, (विशेष प्रकल्प) कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

२/— आपणास विनंती करण्यात येते की,आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६ (१) (अ) (ब) अन्वये संबधित ठिकाणी फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधितांना आदेश निर्गमित होणेस विनंती आहे.